ताळ्यावर नाही असे वाटले. त्याची नजर अभिवितपणे मेणबत्तीकडे गेली. तिचा प्रकाश आता एकदम मोठा झाला होता. तो मेणबत्तीचा तुकडा २।३ मिनिटापेक्षा जास्त टिकाव धरू शकला नसता. त्याने मेणबत्ती डाव्या हातात घेऊन उजव्या हाताने पँटचे खिसे चाचपले. एक पण मेणबत्ती शिल्लक नव्हती. त्याला वाटले आता अंधारातच बसून राहावे लागणार. त्याला कसेसेच वाटले

अंधारात असला म्हणून काय झाले? पण काही न करता निष्क्रियतेने बसून राहयचे म्हणजे काय? एक दोन क्षण द्विधा मनःस्थितीत त्याने घालवले. शेवटी मनाशी काहीतरी ठरवले आणि अविनाशने जोरात शीळ घालून पाण्याच्या रोखाने उडी घेतली.

ती शीळ ऐकताच सेलीमने जोरात ओरडून म्हटले, "मज़्जारे त्याला नक्कीच रस्ता मिळाला असेल. अब हम नीचे नीचे जाएंगे।" त्याने दिलीपकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले.

"ठीक आहे" दिलीप निरुत्साही आवाजात पुटपुटला; त्याला हे अजिबात पटले नव्हते. कारण आता ७॥ वाजले होते. घरी जाणे अत्यावश्यक झाले होते. तरी अविसाठी थांबणे भाग होते

"कुठे गेला असेल कुणास ठाऊक? दिलीप स्वतःशीच पुटपुटला. पण रोशनला त्याचा तो नूर आवडला नाही.

"तुला येवढं. का काळजी तेच कळत नाही मला. आता जाऊच आपण खाली" रोशनच्या या सरबत्तीवर दिलीप काहीच बोलला नाही. त्याने हताशपणे सेलीमकडे पाहिले. सेलीमने त्याला दाद न देता "चल." एवढेच म्हटले.

त्या दोघांनी आपल्याला बॅगासह उतरायला सुरूवात केली. खाली काय असेल याचाच विचार चालला होता. पण पुढे काय वाढून ठेवले असेल याचा यत्किंचितही विचार त्यांच्या मनाला शिवला नव्हता. ते निर्धास्तपणे शेवटच्या पायरी जवळ आले. एकाएकी त्यांना अविनाशची अनुपस्थिती जाणवली तितक्यात किशोरी व रोशन त्या दोघांच्या पाठोपाठ तिथे येऊन पोचल्या.

"अय्या पण अवि कुठे आहे." नकळतच किशोरीने आश्चर्याने विचारले. सेलीम तिच्या प्रश्नाचे काय उत्तर द्यावे या विचारात असतानाच दिलीप म्हणाला, "पुढची वाट पहाण्यासाठी तो पुढे गेला आहे" त्यावर कुणीच काही बोलले नाही. टॉर्चच्या प्रकाशात चमकणाऱ्या त्या पाण्याकडे चौघेजण टकलावून पहात होते त्या प्रवाहाचा चढ उतार असलेला गभीर आवाज मनाच्या कोपऱ्यातील भीतीला जागवित होता.

दोन मिनिटे अशीच शांततेत गेली. मग किशोरी परत शांतता भंग करीत म्हणाली "दिलू तुम्ही दोघे

पुढे जाऊन अविला गाठा आम्ही दोघी मेणबत्त्या घेऊन इथेच थांबतो.''

"बरे." दिलीपने काहीशा निर्जीव स्वरात उत्तर दिले.

"प्रवाह काही फार नाही खोल दिसत. प्रवाह ओलांडून पलीकडच्या दाराच्या चौकटीत काय आहे ते पाहू चल." सेलीम दुजोऱ्यादाखल म्हणाला. त्यावर दिलीपने काहीच न बोलता जपून पाण्यात पाऊल टाकले.

सेलीमने म्हटल्याप्रमाणे पाणी विशेप खोल नव्हते. गुढग्यावर थोडेसे! एकदोन मिनिटात ते त्या दाराच्या चौकटीजवळ जाऊन पोचले. ते दार जिन्यावरून उघडे दिसत असेल तरी ते बंद होते. प्रवाहाला लगटून दाराजवळ एक पायरी होती. त्या पायरीवर ते दोघे चढले अणि दार उघडायचा प्रयत्न करू लागले. थोडेसे धक्के मारल्यावर क ऽ रॅऽऽ असा आवाज करीत ते दार आतल्या बाजूला उघडले.

सेलीमने टॉर्चचा प्रकाश आत सोडला. तो एक छोटासा बोळ होता. आणि आणखीही दोन दारे बोळाच्या डाव्या उजव्या बाजूला होती. वास्तविक ती दारे नव्हतीच डोंगराच्या पोकळीला पाडलेली आयताकार छिद्रे होती. त्यापैकी उजवीकडच्या दारातून दिलीप आणि सेलीम शिरले तथे अधिक थड वाटत होते. ती खोली रिकामीच होती अविचा तेथे मागमूसही दिसत नव्हता. नंतर त्यांचे

लक्ष डावीकडच्या दाराकडे गेले. पण तीही खोली रिकामी पाहून त्यांना आश्चर्य वाटले. टॉर्चच्या सहाय्याने त्यांनी त्या खोलीचे निरीक्षण करायला सुरवात केली. पहात पहाता सेलीम म्हणाला," अगदी रिकामी आहे खोली.'

किशोरी आणि रोशन बराच वेळ त्या दोघांची आणि अविची वाट पहात होत्या. पण अजून त्या तिघांपैकी कोणीही परत येण्याचे चिन्ह दिसत नव्हते. आता साधारण ८॥. वाजून गेले होते. उभे राहून त्या दोघीही थकल्या होत्या. १५।२० मिनिटांपेक्षाही जास्त वेळ गेला. मग त्या आपोआपच पायऱ्यांवर बसल्या. रोशनने जांभई देऊन किशोरीला विचारले,

"अवि त्यांना कुठे भेटला असेल का ग?"

"कुणास ठाऊक? अवि भेटला तर पुढे वाट असली तरी ते जाणार नाहीत.ते तिघेपण–परत येतील." किशोरीने प्रत्युत्तर केले. त्यावर 'हं" असा किंचित नाराजीचा उद्गार काढून रोशन गप्प बसली.

पाण्याचा धीरगंभीर आवाज पूर्ववत चालू होता. अशीच आणखी दहा मिनिटे गेली. तोच आवाज इतक्या परीचयाचा झाला कि तो गुणगुणल्या सारखा वाटत होता. ९ वाजायला आले असावेत. अजून कसलीच चाहूल लागत नव्हती. किशोरी अगदी कंटाळली होती. रोशन देखील. तिने परत विचारले, "किशा, सेलीम कुठे असेल ग ?"

"कुणास ठाऊक, काही कल्पना नाही शिवाय सेलीम काही एकटाच नाही. दिलीप पण आहेच त्याच्या बरोबर." किशोरी किंचित त्राग्याने म्हणाली. रोशन पण चिडली असावी. तरी ती गप्पच राहिली.

त्या शांततेत आणखी ५।१० मिनिटे गेली. दोघी जवळ जवळ पेंगायलाच लागल्या होत्या.

त्याच वेळी ९ वाजता या मंडळीच्या घरी मात्र भलतीच गडबड उडाली होती

पाहुण्यांच्या गडबडीत दिलीप, किशोरीला उशीर झाल्याचे आईच्या लवकर लक्षात आले नाही. पण आठ साडे आठ वाजता जेवण्यासाठी या दोघांना हाक मारल्यावर तिच्या लक्षात आले की, आज दुपारी किशोरी, दिलीप, अवी, रोशन आणि सेलीम पर्वतीवर डबे घेऊन गेली आहेत "कमाल आहे बाई" दिलीपची आई पाहुण्या बाईंचे पान वाढताना म्हणाली.

'का? काय झाले?" दिलीपच्या दादाने रमेशने विचारले "अरे, किशा, दिलू आज मित्रांच्या बरोबर पर्वतीला गेले आहेत ते अजून आले नाहीत?" आईने काळजीच्या स्वरात सांगितले.

"हं थांबली असतील वाटते त्या अविनाशकडे." रमेशने बेफिकिर स्वरात उत्तर दिले

सगळ्यांची जेवणे आटोपली तरी या दोघांचा अजून

पत्ता नव्हता, आता मात्र दिलीपच्या आईला चैन पडेना. तिने रमेशला हाक मारून म्हटले, "तू, त्या अविनाशकडे चौकशी करून ये. हल्ली पोरांना एकटे पाठवायचे म्हणजे." आईला जास्त त्रागा करण्याची संधी न देता तो "बरे जातो," एवढेच त्रोटक उत्तर देऊन तो सटकला. आणि सरळ अविनाशच्या घराची वाट धरली.

अविनाशच्या घरी काय तोच प्रकार होता, अविची धाकटी बहीण अनिता सारखी त्याची वाट पहात आत बाहेर करीत होती, तिला अविदादाखेरीज कोणी खेळायला नव्हतेच. आणि तिचे बाबा देखील नेहमी दिल्लीला असत. मोठ्ठे ऑफिसर होते ना ते! आपल्या दादालाती जगातील अगदी शहाणा माणूस समजायची. पण आज दादा वर ती खूप रागावली होती. तिला न सांगता तो बाहेर गेला होता. पण जसा जसा त्याला उशीर होऊ लागला तसतसा तिचा राग कमी होऊन आत बाहेर होणाऱ्या फेऱ्या वाढल्या. अखेर न राहवून घरात जाऊन तिने आईचा हात हातात घेऊन विचारले,

"आई, दादा कुठे गेला आहे?"

"बाहेर गेला आहे. आत्ता येईल." मृदू स्वरात उत्तर देऊन आई परत कामात गर्क झाली.

अविची वाट पहाता पहात आणखीन् एक तास लोटला. घड्याळात बाराचे ठोके पडलेले तिने ऐकले. मग मात्र

तिच्या उत्कंठेचा कडेलोट झाला. चटकन् घरात जाऊन आईच्या कमरेला विळखा घालून रडक्या सुरात विचारले, "आई, नऊ वाजले की, ग सांग ना दादा कधी येणार आहे?" नऊ वाजल्याचे ऐकून अविच्या आईला पण काळजी वाटू लागली. दिवस भराच्या कामाच्या गर्दीत, तिला वेळेचीही आठवण राहिली नव्हती. तरी अनिताला धीर देण्यासाठी आई म्हणाली, "वेडी रे वेडी, दादा मित्राकडे गेला आहे. आत्ता थोड्या वेळात येईल. तू काही वाचन कर जा." असे त्या म्हटल्या खऱ्या पण त्यांना जास्त काळजी लागली कुणाला त्याला शोधायला पाठवायचे तर तोच मोठा होता. आणि आईला सांगितल्याखेरीज तो कधी मित्राकडे राहिला नव्हता. आजच न सांगता सवरता इतका वेळ बाहेर राहिला होता. पाठविणार तरी कुणाला? अधिक वाट पहाणेच श्रेयस्कर होते.

थोड्या वेळा नंतर साडेनऊचा ठोका पडला. आता त्यांचीही अस्वस्थता वाढू लागली. इतक्यात दारात सायकलची बेल वाजली. त्यांना प्रथम वाटले शेजारी कुणी आले असावें. त्या तशाच कोचावर स्वस्थ बसून राहिल्या. पण अर्धे मिनिटही पुरते गेले नसेल तोच 'अविऽनाश" म्हणून जोरात कुणीतरी मारलेली हाक ऐकू आली. सिनेमाला गेलेली अविनाशची मामा मामी आणि अशोक प्रदिप त्याचे मामे भाऊ आले असतील असेच त्यांना

वाटले. पण ते तर आज गावातल्या आजीकडे रहाणार आहेत. मग कोण असावे त्या विचार करीत दार उघडायला उठल्या. तोच परत एकदा हाक ऐकू आली.

दार उघडल्यावर रमेशला पाहून विचारले "कोण आपण?"

"मी दिलीपचा भाऊ रमेश. दिलीप किशोरी आहेत का तुमच्याकडे?" एका दमात रमेशने आपला हेतू स्पष्ट केला. "नाही, मीच अविनाशची वाट पहात आहे. दुपारी ते सगळे पर्वतीवर गेले आहेत ना? आत्ता पावणे दहा झाले तरी अजून आले नाहीत" अविच्या आई काळजीच्या सुरात म्हणाल्या, "बरे, त्याला पहायला कुणाला पाठवावे तर घरी तसे मोठे कुणीच नाही म्हणून मी नुसतीच वाट पहाते आहे."

"पर्वती खेरीज आणखीन् कुठे लांब गेली कि काय ही पोरे?" रमेश किंचित नाराजीच्या स्वरात पुटपुटला. "मग आता वाट पाहिल्या वाचून गत्यंतरच नाही म्हणायचे." हताश स्वरात अविची आई म्हणाली.

"हं, तसेच करावे लागणार बहुतेक." रमेशने पूर्वीचीच नाराजी प्रकट केली. "आले तुमच्याकडे तर ठेऊन घ्या हं! मी जातो." रमेश सायकलवर टांग टाकून निघून गेला.

आता मालतीबाईंना अधिकच काळजी वाटू लागली

अजून अर्ध्या तासात अवि आला नाही तर बाहेर पडायचेच असा मनाशी निश्चय करीत त्या आत आल्या तोच परत कुणाची तरी "अविनाश" अशी दमदार आवाजात हाक-मारलेली ऐकू आली. त्या तशाच मागे फिरल्या. बाहेर सेलीमचे पपा स्कूटर थांबवून उभे होते. अविच्या आईला पाहून त्यांनी विचारले "सेलीम रोशन, आहेत का? अवि घरी आला का?"

'म्हणजे?" मालती बाईनी थोड्या भितीने प्रश्न केला

"ती दोघेपण घरी आली नाहीत? मीच अविची वाट पहाते आहे."

'पर्वतीला गेलेत ते?" रोशनच्या पपांनी विचारले

"होय तसे सांगून गेलेत खरे. त्याचे वडिलपण घरी नाहीत. मालतीबाई अविच्या आई अस्वस्थ चित्ताने उभ्या राहिल्या. रोशनचे पपा पण कसला तरी विचार करीत शांत उभे होते. मग ते निर्णायक स्वरात म्हणाले,

"भाभी अजून एक तास मी त्यांची वाट पहातो. आता १० वाजलेत. नाहीतर पर्वती पोलीसांना मी त्यांची वर्णने देतो गावात तपास चालूच आहे कदाचित सकाळ पर्यंत येतोलही. त्यांचे बोलणे ऐकून मालती-बाई अस्वस्थ स्वरात म्हणाल्या "पण पोलीसात म्हणजे"

त्यांना मध्येच तोडून सेलीमचे पपा म्हणाले "तुम्ही

घाबरू नका भाभी सकाळपर्यंत अविनाश नक्कीच घरी येईल. बरय येतो." त्यांनी स्कूटर स्टार्ट केली. मालतीबाई विमनस्क अवस्थेत घरात शिरल्या. घर त्यांना कसेसेच वाटू लागले, आणि न कळत मनात वेड्या वाकड्या शंकांनी प्रवेश केला.

११वाजून गेले. मग १२ वरून काटा सरकून १ वर थांबला. या अवधीत रोशनच्या वडिलांनी पोलिसात वर्दी व वर्णने दिली होती. तिनंही घरातले लोक चिन्ताक्रान्त झाले होते. रोशनचे पपा पर्वतीपर्यंत शोध घेऊन आले होते. रमेशच्या सायकलला पण विश्रांती मिळाली नव्हती. मालतीबाई सारख्या कानोसा घेत होत्या. अनिता दादाची वाट पाहून झोपी गेली होती. आणि गुहेत.?

रोशन आणि किशोरी त्या पायऱ्यावर पेंगत होत्या. आणि प्रवाहापलीकडच्या खोल्यातून सलीम आणि दिलीप अविचा शोध घेत होते. अवि त्यांच्या जवळच होता. पण त्यांना सापडत नव्हता.

अविने प्रवाहात उडी टाकली तेव्हा तो प्रवाह कमरे-इतकाच आहे हे त्याला कळून आले. तो चालतच तो प्रवाह जिथे लुप्त होत होता तिथे गेला तेथे जायला त्याला तब्बल पाच मिनिटे लागली. कारण प्रवाहाच्या तळाशी असलेली वाळू-शेवाळे नव्हे प्रवाहाबरोबर पुढे

सरकताना अविच्या पायाखालून निसटत होती तिथे गेल्यावर त्याला समजून आले ती लहानशी फट नसून तो एक दरवाजा खडकात कोरलेला होता. त्यातून यत्किंचितही न वाटता तसाच पुढच्या दालनात गेला. प्रवाहाची खोली इथेही तीच होती. त्याने उजव्या बाजूला सरकून हात लांब केला. ओटयाच्या कडेसारखा तो भाग लागला. त्याने परत दोन्ही हातांनी चाचपून पाहिले. त्या छाती एवढ्या उंचीचा तो ओटा होता. क्षणभर तो अंधारात तसाच उभा राहिला. मग दोनही तळवे कडेला टेकवून त्यांवर ज़ोर देऊन तो झट्कन् ओटयावर चढला. ओटयावर चढल्यावर त्याच्या मनात तीव्रतेने आले. परत प्रवाहात उतरावे आणि मागे परत जाऊन त्या दोघांना मिळावे. पण अंधारात अभवितपणे मागे भिंतीला तो टेकला. टेकल्याबरोबर जुन्याकाळाच्या लाकडी दरवाजांना जसे बोथट रूंद मोठे खिळे ठोकलेले असतात तसा स्पर्श त्याला झाला. त्यावरून चाचपडत हात फ़िरवून पाहिल्यावर त्याच्या लक्षात आले ते लाकडी दार होते. दोन फळयांचे आणि लोखंडी कडी बसवलेले. त्याने ते दार जोर लावून ढकलायचा प्रयत्न केला. कर्रऽऽखट् असा चिरका जुनाट आवाज करून ते दार आतल्या बाजूला उघडले गले. आणि वाऱ्याची एक थंडगार झुळूक अविच्या

तोंडावर आदळली.

अविने क्षणभर डोळे मिटले. व तो त्या दारातून पुढे जाऊ लागला. इथे अधार थोडा विरळ झाल्याचा भास होत होता. कुठून तरी पिवळसर प्रकाश झिरपत होता: त्याच्या डोक्यात एक कल्पना आली. रोशन, किशोरी दिलीप आणि सेलीम तर तिकडे नसतील? त्याने डोळे ताणून अंधारात पहायचा प्रयत्न केला. ती एक भव्य खोली होती आणि पिवडीचा रंगही दिलेला असावा त्यामुळेच तिथे अंधार कमी भासत असावा. खोलीचा रंग ठिकठिकाणी पडल्यामुळे अंधारात ते फ़ार चमत्कारिक वाटत होते. त्याच्या डाव्या हाताच्या भिंतीला एक फळ्यांचा दरवाजा होता घाईने केल्या सारखा वाटणारा! पण अंधारात अविनाशचे लक्ष तिकडे गेले नाही. भिंतीचा आधार घेऊन चाचपडत चालताना तो खोलीच्या उजव्या कोपऱ्यात आल्यावर त्याचा पाय कसल्यातरी चौकोनी वस्तूवर पडला. प्रथम तो दचकला. मग काही इजा नाही असे आढळल्यावर त्याने हाताने चाचपून त्या वस्तू उचलल्या लहान मुलांचे खेळाचें ठोकळे असावेत तशा त्या वस्तू होत्या. कसल्याशा धातूपासून बनविलेल्या असाव्यात. अविने अधिक विचार न करता त्या खिशात घातल्या. ते सहा ठोकळे होते. तो तसाच भिंतीला धरून दोन तीन पावले

गेला. त्याच्या हाताला परत दरवाज्याचा स्पर्श झाला. तो दरवाजा त्याने जोराने ढकलला. तो एकच फळीचा दरवाजा जोराने आवाज करून, करकरून उघडला. उघडल्याबरोबर खोलीतले दृश्य पाहून तो दचकला आनंदलाही. इतक्यात त्याच्या तोंडावर बॅटरीचा झोत पडला आणि पाठोपाठ "अवि तू? असे आश्चर्योद्गार आले

एव्हाना बराच वेळ गेला होता. किशोरीने जागे होऊन घड्याळात पाहिले. पण तिला काहीच दिसले नाही मग तिच्या लक्षात आले अंधारात कसे दिसू शकणार? तिने बॅटरी पेटविली आणि पाहिले अकरा वाजले होते. ती चकित झाली आणि भ्यालीही अविनाश कुठे गेला? दिलीप आणि सेलीम कुठे आहेत? आणि इतका वेळ आपल्या अनुपस्थितीत घरी काय हलकल्लोळ उडाला असेल? तिला काहीच कळेना तिने शेजारी पेंगणाऱ्या रोशनला हलवून जागे केले. रोशनही गोंधळली रडवेली झालेली. किशोरी म्हणाली "रोशा ते तिघे कुठे असतील ग? अकरा वाजलेत आता"

अकरा वाजल्याचे ऐकून रोशन पुरी हादरली आणि तिने रडायलाच सुरुवात केली किशोरीलाही कसेसेच वाटू लागले. ती समजुतीच्या स्वरात म्हणाली, "ए रडू नकोस. आपण शोधूया त्यांना. या पिशव्या राहू देत

इथेच टॉर्च घेऊन जाऊ या."

"पुढे?" रोशन थबकली.

"चल." रोशन निरुत्साही स्वरात म्हणाली.

दोघी पाण्यात स्कर्ट व्यवस्थित खोचून उतरल्या. एकमेकींचा हात धरून, एका हातात टॉर्च धरून पाण्यातून चालत होत्या. हलके हलके दोन मिनिटानी त्या पायरीवर चढल्या व त्या दारातून आत गेल्या. त्या छोटया बोळातून चालायला सुरवात केल्यावर डाव्या बाजुला असलेल्या एका दारावर रोशनच्या हातातल्या टॉर्चचा प्रकाश पडला. घाईनेच त्या दारातून आत शिरल्या. आत



शिरल्यावर त्यांनी खोलीच्या चारी बाजूंना प्रकाश टाकला. तेथे कुणीच नव्हते. पण समोर आणखी एक दार होते. खडकाच्या कमानी प्रमाणे. दोघी निराश होऊन पुढच्या खोलीत सरकल्या. याही खोलीने पूर्वीसारखी त्यांची निराश केली. पण पुढची वाट मात्र दिली या पण खोलीला पुढे जाणारा दरवाजा होता. किशोरीने त्या दारातून पुढे ' प्रकाश टाकला. पूर्वीप्रमाणे ती खोली नव्हती. तो एक बोळ होता. आणि दहा पंधरा फूटांवर तो वळला होता. त्यामुळे तो पुढे किती आहे हे सांगणे अशक्य होते. दोघींनी पुढे जायचे ठरवले. त्या वळणावरून पुढे आल्या तोच पूर्वपरिचित प्रवाहाचा आवाज त्यांच्या कानावर पडला. पण तो प्रवाह मात्र दिसत नव्हता. दिलीप, सेलीम, अवि कदाचित प्रवाहाजवळ असतील असे वाटून त्या पुढे चालतच राहिल्या आणि एकदम त्यांना आढळून आले, त्यांचा रस्ता एका लाकडी दाराने अडवला आहे. त्या लाकडी दाराने मार्ग देताना फार कुर कुर केली नाही. त्याचा कोयंडा आत ओढताच ते उघडले गेले आणि रोशन किशोरी एका भव्य खोलीत दाखल झाल्या. या खोलीला रंग दिलेला होता. याच खोलीत एका तासापूर्वी अवि आला होता. आता त्याच्या शोधासाठी रोशन किशोरी आल्या होत्या. अंधारामुळे अविचे लक्ष डावीकडच्या दाराकडे गेले नव्हते. आता

रोशन किशोरीचेही लक्ष अवि गेला त्या दाराकडे गेले नाही. दोघीसमोरच्या दाराकडे गेल्या. दाराजवळ ओटा होता. आणि तेथून तो प्रवाह वाहत होता. त्यांनी सगळीकडे टॉर्चचा झोत टाकून पाहिला पण लाटांची वलये आणि काळे खडक यांशिवाय त्यांनी काहीच पाहिले नाही. रोशन मनात अगदी खचून गेली होती किंचित रडक्या चिडक्या स्वरात ती म्हणाली ''कुठे गेले असतील ग ते?''

"मी तरी काय सांगू? आपण त्या खोलीत बसूया. माझे पाय दुखायला लागले आहेत." किशोरी तुटक आवाजात म्हणाली. दोघी आत आल्या.

दोघी इतक्या थकल्या होत्या. त्यांनी बैठकच मारली. गुडघ्यात डोके खुपसून विचार करीत त्या बसून राहिल्या. काळजी भीती आणि विचार यांची झोपेशी झुंज चालली होती. पण अखेर नकळत सगळे विचार विसरून त्या झोपेच्या स्वाधीन झाल्या.

अविने ज्या खोलीत प्रवेश केला, त्या खोलीत दिलीप आणि सेलीम अविचा शोध करण्यासाठी आले होते. आणि त्या खोलीचे निरीक्षण करीत ते तेथे थांबले होते. त्या खोलीला लागून असलेल्या प्रवाहाजवळच्या खोलीतून अवि त्या दुसऱ्या दरवाजाजवळ पोचला होता. आणि त्याच खोलीत दिलीप व सेलीम होते. अचानक अवि त्या

खोलीत असलेला पाहून, त्यांना एकदम आश्चर्य वाटले. आणि एकदम सेलीमने "अवि तू?" असा आश्चर्योद्गार काढले. अविला पण त्या गुंतागुंतीत आपण चूकू व त्या चौघांपासून दूर जाऊ अशी भीती वाटत होती. त्यामुळे तो आनंदलाही. इतक्यात आजुबाजूला किशोरी व रोशन न दिसल्यामुळे त्याने विचारले, "त्या दोघी कुठे आहेत?" त्यावर सेलीमने न डगमगता पटकन् उत्तर दिले. "त्या दोघी पायऱ्यांवर बसल्या आहेत." ते ऐकून अविला हायसे वाटले. इतक्यात दिलीप म्हणाला, "आता रात्रीचे साडेअकरा वाजले आहेत. त्या दोघीं घाबरून गेल्या असतील. लवकर ही जागा सोडायला हवी."

त्याचे म्हणणे सेलीम, अविला तत्काळ पटले. इतक्यात नेहमीच्या सवयीप्रमाणे अविने खिशात हात खुपसले. त्याच्या हाताला त्या चौकोनी वस्तू लागल्या. त्याने एकदम जायला निघालेल्या आपल्या जोडीदारांना हाक मारली, "ए. दिलू, सेली, हे बघ त्या रंगीत दालनात मला काय सापडले!" त्याची हाक ऐकून ते दोघे दाराकडे निघालेले परत वळले. आणि त्याच्या जवळ येऊन त्याच्या हाताकडे पाहू लागले अवि बोलता बोलता त्या वस्तू दाखवित होता. "त्या खोलीत एका कोपऱ्यात माझा पाय या डब्यांवर पडला. मी त्या उचलून घेतल्या. सहा आहेत या. आणखी तीन दुसऱ्या खिशात आहेत."

त्या काढण्यासाठी त्याने हात खिशात घातला. एकाएकी अविची बडबड मध्येच तोडून सेलीम म्हणाला, "अरे या सोन्याच्या आहेत"

"काऽ यऽ?" अवि आणि दिलीप ओरडलेच.

"yes" किंचित ताठ होऊन सेलीम म्हणाला, "या छोटयाशा सोन्याच्या डब्या आहेत आणि, यात नक्कीच काहीतरी ठेवलेले असणार. कदाचित जुनी कागद पत्रेही..." जुन्या कागद पत्रांचा उल्लेख ऐकताच अविचे डोळे लकाकले. त्याने झट्‌कन एक पेटी उचलून हातात घेतली व तिचे झाकण उघडायचा प्रयत्न करू लागला पण ती उघडेना. इतक्यात सेलीमने तत्परतेने चाकू पुढे केला. अविने चाकूने ती पेटी उचकायचा प्रयत्न केला आश्चर्य की फट्‌कन् त्या पेटीचे दोन वेगळे भाग झाले आणि त्यातून जुनाट पिवळया पडलेल्या कोऱ्या कागदांचे तुकडे बाहेर पडले. त्याच्याकडे ते तिघे आश्चर्याने पाहू लागले. तिघांच्याही डोक्यात एकच प्रश्न होता. "त्या सोन्याच्या डबीत ते कोरे कागद जपून ठेवण्याइतके त्या कागदात विशेष काय होते?"

अविने त्या कागदातला एक तुकडा घेऊन टॉर्चच्या प्रकाशात निरखून पाहिला. त्याला कसलाच उलगडा झाला नाही. तो मान हलवून म्हणाला, "हे नुसतेच कोरे कागद दिसताहेत." ते ऐकून सेलीम कंटाळलेल्या आवा-

जात म्हणाला, "damn it, मला झोप येते आहे." त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून, अवि विचारी मुद्रेनं म्हणाला, "पण त्यात काही तरी रहस्य असणारच." त्याला तसाच अर्धवट थांबवीत दिलीप म्हणाला, "म्हणजे गुप्तलेखांचाच प्रकार म्हणेना?"

"correct" अवि उत्साहानें म्हणाला, "आपण तसा प्रयोग करून पहायला काय हरकत आहे?"

"हु, पण मला झोप आली आहे." सेलीमने तक्रारीची नविन आवृत्ती काढली.

"मग आमचा झोप न घेण्याचा निश्चय आहे की काय?" दिलीपने चिडक्या आवाजात विचारले.

"पण या सोन्याच्या डब्यांचे काय करायचे? त्या कुठे-तरी ठेवणे भाग आहे. त्या कागदांचे रहस्य शोधून काढायला हवे." सचिंत आवाजात अवि म्हणाला.

"असे कर अवि," आता जरा गंभीरपणा धारण करून सेलीम म्हणाला, "या डब्या तुझ्याकडेच राहू देत. कारण त्या तुला सापडल्या आहेत. त्यातील कागदांबद्दल तुलाच जास्त कुतुहल आहे."

"तेच" किंचित काळजीच्या आणि रागीट स्वरात दिलीप म्हणाला, "तुमचे बेत ठीक आहेत पण आता आमच्या भगिनींना जाऊन प्रथम मिळाले पाहिजे. आता इथून बाहेर पडणेच श्रेयस्कर होईल कदाचित." त्याच्या

बोलण्याने अवि आणि सेलीम परत जमिनीवर उतरले. अविने त्या डब्या खिशात घातल्या आणि आपला टॉर्च उचलला. सेलीमने पण मेणबत्त्या हातात घेतल्या ते तिघे त्या खोलीतून बाहेर पडून त्या लांबलचक बोळातून चालू लागले.

दोन मिनिटातच ते त्या प्रवाहाजवळच्या पायरीवर येऊन पोचले. त्या अरूद प्रवाहावरून टॉर्चेसचा प्रकाश फेकीत अवि म्हणाला, "त्या दोघी झोपल्या असतील--" त्याचे वाक्य संपायच्या आत, दिलीपच्या तोंडचा उद्गार ऐकू आला. "हे काय?" अविने चमकून दिलीपकडे पाहिले. तोच सेलीमने कर्कश्श आवाजात प्रश्न विचारला 'रोशन कुठे?' तिघांनी परत परत समोरच्या पायऱ्यांवर टॉर्चेसचे झोत सोडले. पण तेथे तीन चार छोटया ॲअर बॅग आणि वॉटर बॅग्ज खेरीज काहीच नव्हते. सेलीमने तर अक्षरश: धीर सोडून डोळयातून पाणी काढायला सुरवात केली होती. दिलीपची घाबरलेली दृष्टी टॉर्चच्या झोताबरोबर इकडे तिकडे फिरत होती. अविनाश हतबुद्ध होऊन त्याकडे आणि समोरच्या पायऱ्यांकडे पहात होता.

"त्या गेल्या तरी कुठे?" तिघांच्या चेहऱ्यावर एकच प्रश्नचिन्ह दिसत होते, तीन चार मिनिटे शांततेत ते उभे राहिले. सामान टाकून त्या कुठे गेल्या असतील याचा अंदाज घेत राहिले.

सेलीमने हळूच विचारले, "मी जोरात हाक मारू का? त्यावर तिघांनी एकमेकांकडे पाहिले. कोणी बोलले नाही. जणू मोठ्याने ओरडण्याची सुद्धा त्यांना भीती वाटत होती. त्या स्तब्ध काळोख पांघरलेल्या त्या शांततेत त्यांना स्वतःचा आवाज परका, भीतीदायक वाटत होता. सेलीम विचारून तसाच हाक न मारता शांत राहिला होता. दिलीपने दोघींना जोरात हाक मारल्या दोनदा! तो आवाज तिथेच काही क्षण घुमला पण त्यांना प्रतिजबाब मिळाला नाही. क्षणभराने अविने सेलीमचा हात ओढला, आणि उत्साही स्वरात म्हणाला "ए, हे बघ असे वेड्यासारखें बघू नकोस मी काय सांगतो त्या दोघी आपली वाट पाहून इकडेच कुठेतरी गेल्या असणार." मागच्या बाजूला हाताने निर्देश करीत अवि म्हणाला अर्थात त्यांच्याकडे एकच टॉर्च आहे. आणि कदाचित अपुऱ्या प्रकाशामुळे त्या नक्कीच चक्रावल्या असणार तेव्हा आपण परत मागे गेले पाहिजे. आणि त्यांना शोधायला जाताना ठराविक अंतरावर एक एक मेणबत्ती लावूया कदाचित आपल्याला त्या सापडल्या नाहीत तरी त्यांना मेणबत्तीच्या आधारे मार्ग सापडेल.

"बरं" किंचित मलूल स्वरात सेलीम उद्गारला.

'हूंऽऽ" दिलीपने एक लांबलचक सुस्कारा टाकला.

अविने खिशातून मेणबत्त्या काढल्या. चारपाचच होत्या

त्या "तुझ्याकडे किती आहेत?" अविने त्याचा छोटा लायटर खिशातून काढीत दिलीपला विचारले. दिलीपने आणि सेलीमने आपापले खिसे उलटे केले. मेणबत्त्या मोजून सेलीम म्हणाला "माझ्याकडे सहा आहेत."

"माझ्याकडे शून्य!" कोरड्या आवाजात दिलीप उद्गारला.

"मग तुम्ही इथेच थांबा. मी त्या बॅगेत काही मेणबत्त्या असल्या तर घेऊन येतो." अविने येवढे सांगितले आणि उत्तराची वाट न पहाता त्याने पायरीवरून उतरून पाण्यातून पावले टाकायला सुरवात केली. त्यांच्याकडे सेलीम पहातच राहिला. पटकन् तो अरूंद प्रवाह पार करून पायऱ्यावरील बॅगतील मेणबत्या काढून घेतल्या त्या जवळ जवळ दोन डझन होत्या. त्याने खिशातल्या त्या सोन्याच्या (?) डब्या बॅगेत टाकल्या. आणि मेण-बत्त्या खिशांत कोंबून परत आपल्या दोस्तांना मिळाला.

त्या मेणबत्या घेऊन परत आल्यावर त्यांनी तेथेच एक मेणबत्ती पेटवून ठेवून दिली. आणि त्या दारातून आत गेल्यावर दोन चार पावलांनीं दुसरी पेटवली.

चालत चालत अवि म्हणाला "मी ज्या खोल्याच्या चक्रव्यूहात सापडलो होतो ना, तिथे आपण पाहू या."

"चल." दिलीपने संमती दिली.

अविने डाव्या बाजूला कमानीसारखे दिसणारे ते

दुसरे दार गाठले. त्याच्या पाठोपाठ दिलीप आणि सेलीम पण आले. अविने त्या दाराशी एक मेणबत्ती पेटवून ठेवली. आणि त्या खोलीत त्यांनी प्रवेश केला. ही खोली ओबडधोबड होती. हिच्या पुढचे दारही नैसर्गिक कमानी सारखे होते. त्यांनी त्या खोलीत तीन मेणबत्त्या पेटवून ठेवल्या. पलीकडच्या दारातून बाहेर पडताना दाराशी आणखी एक मेणबत्ती लावून ठेवायला सेलीम विसरला नाही. अशा हेतूने कीं एक विझली तर दुसरीत तिसरीत तरी थोडा जीव असावा.

ही पुढची खोली रंगवलेली होती. पण ठिकठिकाणी तिचा गिलावा ढसळलेला होता मघाशी अंधारात अविला ज्या अनेक गोष्टी दिसल्या नव्हत्या त्या आता दिसू लागल्या. दारा समोरच्या भिंतीला टेकून एक ओबड धोबड लाकडी बाकडे ठेवलेले होते एका कोपऱ्यात जुनाट पिवळट पडलेली. हस्ताक्षरातील पोथीसारखी वाटणारी काही कामे तेथे पडली होती ती प्रथम सेलीमला मिळाली त्यांच्या हातातली पोथीची पाने पहाताच अवितल्या संशोधकाने उड्या मारायला सुरवात केली पेटवण्यासाठी बाहेर काढलेली मेणबत्ती तशीच ठेवून त्याने सेलीमच्या दिशेने झेप घतली.

"काय आहे रे ते? बोटाने निर्देश करीत अविने विचारले.

"है ना? ही कसली तरी पोथीची पाने दिसताहेत." ती न वाचल्यामुळे सेलीमने मोघम उत्तर दिले.

"पाहू?" अविने उत्सुकतेने हात पुढे केला. त्यावेळी तो त्या पोथीचाच विचार करीत होता. आता किशोरी आणि रोशन त्याच्या खिजगणतीतही नव्हत्या. सेलीमने ती पाने अवीच्या हातात देऊन टाकली आणि त्याला तरी कुठे एवढा इंटरेस्ट होता त्यात?

ते एक हाताने शिवलेले आणि लिहिलेले पोथीचे बाड होते. अविने ते उलगडून पहायला सुरवात केली. बघता बघता त्याने एकदम शेवटचे पान काढले. एक दोन मिनिटानंतर तो ओरडला, "आयला, गम्मतच आहे रे!"

त्याचे ओरडणे ऐकून मेणबत्त्या पेटवीत असलेल्या दिलीप आणि सेलीमने आश्चर्याने मागे वळून पाहिले.

"काय गम्मत आहे रे?" दिलीपने उत्सुकतेने विचारले.

"हे बघ, इकडे ये ना." अविने त्याची उत्सुकता ताणली. ते दोघेही जवळ आले.

"काय आहे रे?" इति दिलीप.

"हे बघ, पाहिलेस काय आहे?" अवि पोथीची पाने उलटत म्हणाला.

"हे ना? गीतेचे हस्तलिखित बाड आहे." लक्षपूर्वक पाहून सेलीम म्हणाला.

"आणि हे पाहिलेस का?" अविने शेवटचे पान उल-

टले. आणि त्यावर खाली डाव्या बाजूला कोपऱ्यात असलेल्या मजकूराकडे बोट दाखवून म्हणाला. आणि तो दोन बोटी मजकूर वाचून दिलीप एकदम उद्गारला. "आयला!"

तो दोनबोटी मजकूर म्हणजे बाळबोध मराठीत केलेली सही होती. 'रघुनाथराव!' अशी सहाच अक्षरे होती. पण त्या शब्दांनी कदाचित सहाशे शब्दांना मागे दडविले होते.

त्या बोरूने लिहिलेल्या आणि लांबलचक शिरोरेपा असलेल्या सहीकडे पहात दिलीपने एक शंका काढली, "कायरे, मराठ्यांच्या इतिहासात प्रसिद्ध असलेल्या रघुनाथराव पेशव्याची तर ही सही नसेल?" त्याला दुजोरा देण्यासाठी सेलीम उद्गारला, "त्यांचाच हा खलबत खाना नसेल कशावरून?" तेवढ्यात अविने एक कुत्सित स्वर काढला, "रघुनाथराव पेशवा स्वतः हाताने गीता लिहून काढण्याइतका सोज्वळ होता की काय?"

"पण दुष्ट प्रवृत्तीच्या त्याच्यात श्रद्धेचा एखादा लहानसा कोपरा नसेल कशावरून?" सेलीम म्हणाला, "आणि तो तसा सोज्वळ असेल वा नसेल, आपण काही हस्ताक्षर तज्ज्ञ नाही, किंवा इतिहास संशोधक पण नाही. याचा निर्णय करायला."

"हे पहा, आपण हे बाड इतिहास संशोधक मंडळा-

लाच देऊया." समजुतीच्या स्वरात दिलीप म्हणाला, "आणि आता मेणबत्त्या पेटवून पुढच्या शोधाला निघूया."

"चल." सेलीम म्हणाला आणि त्या खोलीच्या दारात जाऊन उभा राहिला. अविने ते बाड आपल्या शर्टमध्ये खोचून ठेवले. दिलीपने उजव्या बाजूचे दार उघडले. ती पण एक लहानशी खोली होती, आत शिरल्याबरोबर डाव्या उजव्या बाजूला खडकात खोदलेली दारे होती. या खोलीची स्थिती पूर्वीच्या पेक्षा वेगळी नव्हती या पण खोलीत अविने आणि दिलीपने दोन मेणबत्त्या लावल्या. सेलीमने उजव्या हाताच्या दाराबाहेर डोकावले: त्या दारापलीकडे असलेल्या खोलीच्या बाहेरून प्रकाश झिरपत होता त्याच्या लक्षात आले आपण आलो त च हा पलीकडचा बोळ असणार. तो मागे फिरला दिलीप आणि अविने मेणबत्त्या पेटवल्या होत्या.

'तिकडे काय आहे. सेली?" अविने खिशातून मेणबत्ती काढता काढता विचारले.

"काही नाही. पलीकडे खोली आणि त्या पलीकडे आपण आलो तो बोळ. आपण याच दाराने जाऊया." डाव्या दाराकडे निर्देश करीत सेलीम म्हणाला

तिघेही दाराबाहेर आले. अविने टॉर्चचा झोत सगळीकडे फिरवला. तो एक अरूंद बोळ होता. उजव्या हाताल १५।२० फुटांवर तो वळत होता. आणि डाव्या हाताला

सहा सात फुटांवत संपत होता, आणि जिथे संपत होता तिथे एक दार होते. "कुठे जायचे रे?" सेलीमने अविला विचारले अवि बोळाच्या दोन्ही टोकांकडे टकमक पहात राहिला. पटकन् त्यालाही निर्णय करता येईना, एकदयात दिलीपनेच तो प्रश्न सोडवला आपण या बोळाच्या वळणापर्यंत मेणबत्त्या लावू आणि आधी या दारापलीकडे काय आहे ते पाहू"

'चालेल" अविला त्या प्रश्नातून सुटल्याचा आनंद झाला. नाहीतरी ती जबाबदारीच होती.

तिघांनी वळणापर्यंत चार मेणबत्त्या लावून ठेवल्या आणि त्या दाराजवळ आले. प्रवाहाचा अस्पष्ट आवाज ऐकू येत होता. इतक्यात थबकून अविनाश उदगारला "अरे पण"

"काय रे?" सेलीमने मागे वळून विचारले.

"मधाशी मी या रस्त्याने आलो ना त्या वाटेत दारे असलेल्या सगळ्या खोल्या होत्या. आणि" अविने प्रश्नार्थक चेहरा केला.

"असू देत हे दार उघडून पाहूया. प्रवाहाचा आवाज येतो आहे. तेव्हा आपण नक्कीच प्रवाहाच्या जवळ असू" दिलीप कटाळवाण्या सुरात म्हणाला.

"बरे आहे तू म्हणतोस तसे." अविने कोयंडा ओढला. आणि दार त्याच्या बाजूने उघडले गेले थंडगार हवेचा

झोत त्यांच्या तोंडावर आदळला. क्षणभर त्यांना शिरशिरल्यासारखे झाले. दार उघडल्याबरोबर अविच्या हातातली मेणबत्ती विझली होती. सेलीमने ती परत हाताच्या आडोशाने पेटवली. त्या प्रकाशात एकाएकी त्या खोलीत भिंतीला टेकून गुडघ्यात डोके खुपसून बसलेल्या रोशन, किशोरी दिसल्या.

"सापडल्या" अविने जोरात टाळ्या पिटल्या पण त्या दोघींच्या गाढ झोपेत थोडाही व्यत्यय आला नाही. दिलीपने त्या दोघींना गदगदा हलवले. अविने दोन मेणबत्या पेटवून जमिनीवर ठेवल्या. एव्हाना त्या जाग्या झाल्या होत्या.

एकदम त्या प्रकाशाने डोळे दिपून दोघींनी परत डोळे मिटले त्यावर अवि किंचित वैतागून म्हणाला,

"ए झोपू नका परत. पुष्कळ उशीर झाला आहे आपल्याला."

"ए ओरडू नकोस." 'किशोरी डोळे चोळीत त्याच्यावर खेकसली. त्या उठून उभ्या राहिल्या.

"तुम्ही इतकावेळ होतात तरी कुठे? आम्ही तुम्हाला किती शोधले पण तुम्हाला कसे कळले आम्ही इथे आहोत म्हणून?" रोशनने एकदम प्रश्नांची फैर झाडली.

"ए तुझे प्रश्न थांबव जरा. सगळे सविस्तर कळेलच आणि बरका दिल्या, मला त्या सहा पेट्या याच खोलीत

जिन्या समोरच्या दाराजवळ लावलेल्या मेणबत्तीत अगदी थोडा जीव उरला होता. त्यांच्या बॅग्ज पायऱ्यांवर अस्ताव्यस्त पडल्या होत्या. "मजाच आहे अवि. किती जवळची वाट आहे. तुला कशी कळली? "कौतुक मिश्रित उत्सुकतेने रोशनने विचारले.

चाळीस पन्नास पायऱ्या चढून एकदाचे वर त्या अरूंद बोळीत आले तेव्हा पाचीजणांनी सुटकेचे निःश्वास टाकले. एव्हाना साडेबारा वाजून गेले होते, रोशन तिथेच बसकन मारीत म्हणाली, "अवि, आपण इथेच बसूया. माझे पाय दुखताहेत."

"नको, ते शामदान पडलय त्या खोलीत जाऊया. या अरूंद जागेपेक्षा ती खोली जास्त मोठी आहे." अविने आपली नापसंती प्रकट केली.

उंच कपाटासारखे दिसणारे ते दार उघडेच होते. आणि आश्चर्य म्हणजे ते मोडक्या खुर्चीवरचे शामदान अजून जळत होते. त्यांचे डोळे ते पाहून आश्चर्याने अक्षरशः विस्फारले. पोटात कावळे जोरात ओरडत होते.

अविने डबा वगैरे काढला. इतक्यात त्याला कसलीशी आठवण झाली असावी. तो उभा राहिला आणि ...मध्ये खोचलेले गीतेचे हस्तलिखित बाहेर काढले. ...शोरी रोशनच्या डोळ्यात प्रश्नचिन्हाचा अंकुर ...वला. ...शातल्या सोन्याचा (?) सहा डब्या दिसू... ...ल्या. दोघींचे कुतूहल अधिकच वाढले. अ...

बसला तितक्यात रोशनने विचारलेच "डब्या आणि ती वही कसली रे अवि?"

"थांबा. पोटात काहीतरी जाऊ देत. मग सांगतो सगळे." अवि रोशनकडे पाहून हसत म्हणाला.

अविची सतत बडबड चालूच होती. खाताना हात थांबवून तो म्हणाला "मला वाटते सोन्याच्या डब्यातून (?) उगीच कोणी कोरे कागद ठेवणार नाही. यात काही रहस्य असलेच पाहिजे. (किंचित थांबून) अरे असे तर नसेल?"

"कसे?" इति दिलीप.

"मला वाटते गुप्त लिपित काहीतरी लिहिले असले पाहिजे म्हणजे सांगू का? असे असेल मागे आपण



'पिशाच्चांच्या लीला' पुस्तकात गुप्त लेख लिहिण्याच्या आणि वाचण्याच्या कृति वाचल्या होत्या. आठवते का? अविने सवाल केला. चौघांनिही आठवण्याचा यत्न केला. इतक्यात रोशन ओरडली "अरेच्या आठवले, ते बघ आपण वाचले होते ना? लिंबाच्या रसाने लिहून वाळवलेला कागद जाळला तर पिवळी अक्षरे दिसतात. आवळ्याच्या रसाने लिहिले तर हिरवी दिसतात आणखी पुष्कळ कृती होत्या जाऊ दे आता नाही आठवत." ती परत आठवायचा प्रयत्न करू लागली.

"बरोबर! अविने शेरा मारला कोरफडीचा रस, साबणाची अक्षरे या सोप्या कृति होत्या आपण करून पाहू या प्रयोग"

एव्हाना सर्वांचे खाणे आटोपले होते. अविने त्या डबीतले कागद काढले. व दुसरी डबी काढली. आश्चर्य ती डबी रिकामी होती. उरलेल्या चारही डब्या रिकाम्याच होत्या

"कमाल आहे एकाच डबीत हे तुकडे ठेवण्याचा त्यांचा हेतु तर समजत नाही बुवा?" अवि पुटपुटला.

"बरं" अविने पेटीकडे खाली पहात उत्तर दिले.

"त्या शामदानावर धर." इतकावेळ गप्प राहिलेल्या दिलीपने सूचना केली. अवि विचारमग्न नजरेने त्याच्या कडे पहात म्हणाला, "तसेही केले असते, पण कागद फार जुने आहेत. फरऽकन् जळून जातील. मग अक्षरे दूरच." परत त्या कागदाच्या कपट्यांकडे निरखून पाहू लागला.

"हे बघ खाऊच्या पुडयांचे कागद आहेत ना. त्याची शेकोटी करू. त्यावर हे डब्याचे झाकण तापवू. त्यावर हे कपटे ठेवू—म्हणजे कागद जळण्याची भीती रहाणार नाही." किशोरीने विजयी मुद्रेने त्याच्याकडे पाहिले अवि जरा खिजल्यासारखा झाला. पण त्या कल्पनेने तो खुलला होताच.

सेलीमने भराभरा खाऊचे कागद गोळा केले. आणि त्यांना काडी लावली. किशोरीने झटकन् पसरट डब्याचे झाकण त्या जाळावर ठेवले. आणि अविने त्यावर डबीतले दोन कपटे टाकले.

सगळे श्वास रोधून त्या कपटयांकडे पहात होते. इतक्यात अविच्या पुढे आलेल्या हाताने झाकणासकट—ते कपटे उचलले. सगळ्यांनी एकदम अविकडे आश्चर्याने पाहिले. अविने हलकेच झाकण जमिनीवर ठेवले,

अंगठयाच्या लांब नखाने एक कपटा हलकेच उलटून ठेवला. त्याच क्षणी सेलीम आणि दिलीपच्या तोंडून "आँ" असा उद्‌गार निघाला. सगळे डोळे त्या छोटया कपटयांवर रोखलेले होते.

"Simly great" अविच्या तोंडून एक उद्‌गार वाचक बाहेर पडले. प्रत्येक अक्षर लावून वाचावे लागत होते. एक दोन मिनिटांनी अवि म्हणाला, "मी सांगतो काय लिहिले आहे ते." परत क्षणभर त्याने त्या कागदांकडे पाहिले "पण प्रत्येकाने स्वतःच्या हातात तुकडे घेऊन

पहा. एक तुकड्यावर लिहिले आहे, "श्रीमंत नारायण-राव पेशवे यांजसी–" आणि दुसऱ्या कपट्यावर आहे "गारदी घुसवावे–" अविने ते तुकडे दिलीपच्या तळव्या-वर दिले. "नारायणरावाच्या खुनाचा कच्चा मसुदा येथेच तयार झाला असावा. नाही का?" "मलाही तेच म्हणायचे आहे. रघुनाथराव पेशव्याचा हा खलबतखाना असावा." रोशनने अविला दुजोरा दिला. "आपण सगळे तुकडे पाहू या का?" किशोरीने विचारले "ते उद्या पाहू. आता अेक वाजला आहे" अविने तिची सूचना धुडकावली

"बरोबर आहे" दिलीप गंभीरपणे म्हणाला, "आपल्या घरचे लोक किती काळजी करीत असतील याचा विचार करा. आताच जरी निघायचे नसले तरी पहाटे आपल्याला जायलाच हवे आहे आता थोडी झोप घ्यावी. काय?" याला अर्थातच विरोध झाला नाही झोप घेण्याची सूचना न करताच त्यांनी ताणून दिली असती. पेटलेले शामदान न विझवता बॅग्ज उशाखाली घेऊन ती धाडसी टोळी झोपेच्या आधीन झाली

पहाटेचे जवळजवळ साडे चार वाजले होते. अविच्या घरी देवघरात लाईट चालू होता. देवासमोर एका सतरंजीवर अविची आई बसली होती. 'आई" अशी अस्पष्ट आवाजात मारलेली हाक ऐकू आली क्षणभर तो त्यांना त्यांना भास वाटला. परंतु परत "आई, मी आलो आहे" अशी आणखी स्पष्ट हाक ऐकू आली. त्या

सरशी त्या झटकन् उठल्या आणि बाहेरच्या दाराकडे धावल्या. त्यांनी घाईने दार उघडले. अविच्या आईला वाटले आपल्याला हर्षवायूचा धक्काच बसतो आहे. बाहेर अवि आणि त्याची कंपनी उभी होती. त्यांनी झटकन अविला जवळ ओढले. त्याच्या पाठीवरून हात फिरवीत त्यांनी विचारले, "कुठे गेला होतास रे तू!" क्षणात् त्याला दूर करून दाराबाहेर उभ्या असलेल्या रोशन, किशा, दिलू आणि सेलीला म्हणाल्या

"आत या ना. मी विसरूनच गेले बाई."

'आता तुझी आई काय म्हणेल रे अवि?" रोशनने दबलेल्या आवाजात प्रश्न केला. "काही नाही. मी सगळे व्यवस्थित सांगणार आहे आईला. तुझ्या पपांना आणि दिलीपच्या पण." अविने कोचावर रेलून डोळे मिटून घेतले.

"आपली पाठतर फार दुखायला लागली आहे बुवा, त्या दगडावर झोपून!" पाय ताणीत दिलीप कुरकुरला.

"हे पहा." आळस देत अविनाश म्हणाला, "आपण शोधून काढले आहे, सापडले म्हणा, पण ते आपल्याला सापडले आहे. तेव्हा कृपा करून घरातल्या पब्लिकशिवाय इतरांना ही हकिकत कळणार नाही याची काळजी घ्या." इतक्यात ट्रेत कॉफीचे कप घेऊन अविची आई आली. ट्रे मधल्या टिपॉयवर ठेवून त्या म्हणाल्या, "आता पटकन घ्या कॉफी. मला ऐकायचे आहे तुम्ही काय काय खोड्या केल्या त्या." सगळ्यांची एकवार अविच्या तोंडाकडे

पाहिले. त्या हसल्या. "अरे घ्या ना मी काही रागावले नाही." मग भराभरा कप उचलले गेले.

कॉफ़ी पोटात गेल्यावर प्रत्येकाच्या चेहऱ्यावर बरीच तरतरी दिसत होती. "आणखी हवी का?" अविच्या आईने विचारले. सगळ्यांनी नकार दिला. मग त्या ट्रे घरात ठेवून आल्या.

"आता सांगा" मालती बाईंनी चावी दिली.

"आई मी सांगतो. अविने घाईने सुरवात केली" काल दुपारी दोन वाजता आम्ही ठरल्या प्रमाणे पर्वतीवर गेलो." त्याची गाडी थांबवल्यावर किशोरी रोशनने आपली चुकामूक कशी झाली ते सांगितले. सहा वाजून गेले होते. अवि आठवून आठवून एक एक मजा सांगत होता. त्या पेटचा गीतेची हस्त लिखित वही आणि ते तुकडे सगळे अविने आईला दाखवले. सगळे दाराकडे पहात होते. सेलीमचे पपा आत शिरताना दिसले.

"बसाना" अविच्या आईने त्य.चे स्वागत केले "आत्ताच चार वाजता ही कंपनी आली बरेच साहस करून आले आहेत"

'सच?" रोशन सेलीमकडे हसून पहात पपांनी विचारले रोशन सेलीमने चोरून एकमेकांकडे पाहिले. काय उत्तर द्यावयाचे?

"मी सांगतो, आम्ही एक शोध लावला आहे" अविने रोशन सेलीमला पेचात पाहून मदतीचा हात पुढे केला.

"सच? बताओ तो" रोशनच्या पपांनी फर्मावले इतक्यात दोन माणसे पांढऱ्या स्कूटरवरून उतरली. दिलीपचे पपा आणि त्याचा मोठा भाऊ रमेश होते. मालतीबाईच्या प्रसन्न चेहऱ्याकडे पाहून दोघेही संभ्रमात पडले होते. त्यातून त्यांना सोडवित मालतीबाई म्हणाल्या

"आत या आणि पहा आपले चिरंजिव"

"केव्हा आले परत" दिलीपच्या पपांनी आत येता येता प्रश्न केला आणि समाधानाने निश्श्वास टाकला.

आता ही पंचकडी फार ग्रेट झाली आहे. बर का ते गीतेचे बाड कपटे पेट्या सेलीमच्या पपांनी इतिहास संशोधन खात्याकडे दिले आहेत. आणि त्याबद्दल सगळ्यांना सोनेरी अक्षरातील प्रशस्ती पत्रके पण मिळाले आहेत. अविने पपांना ही कथा पत्रातून लिहिली आहे ते पण बक्षिस आणणार आहेत. एकट्या अविला न तर पाचीजणांना काय ते अविला पण ठाऊक नाह

अरेच्चा! शेवटची गम्मत राहिलीच की सांगायची. गुहेबद्दल? ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये किशोरी, सेलीमचे वाढदिवस गुहेतच साजरे केले बरका! आता आमच्या लिडरचा वाढदिवस चार जानेवारीला मोठ्या प्रमाणा-वर साजरा होणार आहे गुहेतच! तुम्हाला आमंत्रण नाही. कारण हे मि[illegible] पंचकडी पुरतेच मर्यादित [illegible]

BVBK-0400118